# श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
# अहवाल
## शैक्षणीक वर्ष २०१८-१९

श्रीकृष्ण महाविद्यालयाचा "राष्ट्रीय सेवा योजना" विभाग शै. वर्ष. १९९६-९७ पासून सुरु करण्यात आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महाविद्यालयास नियमित कार्यक्रमासाठी ३०० विद्यार्थी मंजुर केलेले असून विशेष शिबिरासाठी मंजूर संख्या १५० इतकी आहे. शै. वर्ष २०१८-१९ करीता विभागात नियमित कार्यक्रमासाठी १५३ मुले व १४७ मुली अशी एकुण ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. तसेच विशेष शिबीरा करीता ६९ मुले व ८१ मुली अशी एकुण १५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती व सर्व स्वयंसेवक दि. १२.१२.२०१८ ते १८.१२.२०१८ दरम्यान मौजे एकोंडी (ज) येथे संपन्न झालेल्या "जलसंवर्धन व जलव्यवस्थापन" या विशेष शिबीरासाठी हजर होते. विद्यापिठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविले जाणारे सर्व कार्यक्रम विद्यापिठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचनांनुसार महाविद्यालयात व परीसरात परीणामकारक रित्या राबवण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, अरोग्य शिबीर, परीसर स्वच्छता, स्वच्छ भारत अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिवस, मतदान जनजागृती अभियान, कॅशलेस व्यवहार, जागतीक एडस् दिन, अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी कार्यक्रम राबवण्यात आले. तसेच विशेष दिनांनिमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले. कांही प्रमुख कार्यक्रमांचा अहवाल तारखेसह खाली देत आहोत.

### १) आंतरराष्ट्रीय योग दिवसः

दि. २१.०६.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या दि. १३.०६.२०१८ रोजीच्या पत्रानुसार आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयात दि. २१.०६.२०१८ रोजी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरासाठी "नेहरु युवा केंद्र" उस्मानाबाद यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व "नेहरु युवा केंद्र" उस्मानाबाद (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात दि. २१.०६.२०१८

रोजी सकाळी ७.०० वाजता योगशिबीराचे आयोजन करण्यात आले. सदरील शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी दि. २०.०६.२०१७ रोजी महाविद्यालयात प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व नियोजन करण्यात आले.

गुंजोटी गावातील सरपंच, सदस्य व ग्रामस्थ तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी यांना दि. २०.०६.२०१८ रोजी प्रत्यक्ष भेटून तसेच पत्र देऊन शिबीरास उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात आले. तसेच परिसरातील सर्व शाळा, ज्युनिअर कॉलेज, सरकारी दवाखाना इत्यादी ठिकाणी भेटी देऊन तसेच पत्र देऊन योग शिबिरास उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात आले. यासाठी रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम व डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे यांनी विशेष परीश्रम घेतले.

दि. २१.०६.२०१८ रोजी सकाळी ठिक ७.०० वाजता योग शिबीरास सुरुवात झाली. योग प्रशिक्षक म्हणून महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक डॉ. आर. डी. पात्रे सर उपस्थित होते. शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य, कर्मचारी, गावतील ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. सकाळी ७.०० ते ८.१५ या वेळेत योगशिबीर पार पडले. शिबिराच्या शेवटी रा. से. यो. च्या वतीने सर्वांसाठी दुध व पाण्याची सोय करण्यात आली होती.

**२) वृक्षारोपणः**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे दि. १३.०६.२०१८ रोजीचे पत्र व मा. महाराष्ट्र शासन यांचे १३ कोटी वृक्षलागवड संकल्प याची पुर्तता करण्यासाठी महाविद्यालयात दि. ०१.०७.२०१८ ते दि. १५.०७.२०१८ दरम्यान वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. मागील कांही वर्षापासून सतत होणारे अवर्षण, अनियमित पर्जन्य, तसेच सतत पडणारा दुष्काळ व पाण्याचे दुर्भिक्ष्य व या सर्व बाबीचा विचार करता झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड व त्याहीपेक्षा त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज ठरलेली आहे. वृक्षलागवडीचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन महाविद्यालयात शै. वर्ष. २०१४-१५ मध्येच प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, व भूगोल विभागाचे विभागप्रमुख डॉ. मिलिंद सुर्यवंशी यांच्या विचारातून व प्रयत्नातून महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी व रासेयो चे विद्यार्थी यांनी एकत्रितपणे "पर्यावरण मंडळाची" स्थापना केलेली आहे. या मंडळामार्फत महाविद्यालयात विविध पर्यावरण विषयक उपक्रम राबवले जातात. तसेच हे मंडळ दरवर्षी कांही झाडे दत्तक घेऊन त्यांचे संवर्धन करते. त्यामुळे महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. तसेच २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे "इको क्लब' ची स्थापना करण्यात आलेली आहे. याअंतर्गत रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम

कदम, डॉ. डी. पी. चव्हाण व डॉ. एम. जे. अंबुसे व विद्यार्थी महाविद्यालयाच्या परीसराची देखभाल करतात.

दि. ०१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात वृक्षारोपण व परीसरातील आदर्श शेतक-यांचा सत्कार असे कार्यक्रम घेण्यात आले. दि. २६.०६.२०१८ पासून गुंजोटी परीसरात प्रत्यक्ष भेटी देऊन वृक्षलागवडीचे महत्व पटवुन देण्यात आले तसेच दि. ०१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात वृक्षलागवडीस उपस्थित राहणेचे अवाहन करण्यात आले. दि. ०१.०७.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करुन सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. सदरील कार्यक्रमास संस्थेचे सर्व पदाधिकारी, गुंजोटी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. आर. डी. पात्रे रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे व सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शै. वर्ष. २०१८-१९ मध्ये रासेयो विभाग व रोटरी क्लब उमरगा यांच्यात परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला व त्या अनुषंगाने रोटरी चे सर्व पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. एक अनोखा उपक्रम सुद्धा या वेळेस राबवण्यात आला तो म्हणजे मागील वर्षी लावण्यात आलेल्या झाडाचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. दि. ०१.०७.२०१८, ०५.०७.२०१८ व ०६.०७.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परीसरात १०० रोपे व दि. २५.०७.२०१८ रोजी दत्तक गाव मौजे एकोंडी येथे १८० रोपांची लागवड करण्यात आली. २०१८-१९ या शै. वर्षात किमान ३०० वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी रासेयो च्या कार्यक्रमाधिका-यांबरोबरच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, डॉ. आर. डी. पात्रे व लोकमतचे पत्रकार श्री. सिद्धु देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**३) जागतिक लोकसंख्या दिनः**

दि. ११.०७.२०१८ रोजी भूगोल विभागाच्या मदतीने महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी हे होते तर प्रमुख वक्ते प्रा. आर. जी. कोळी यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. डॉ. आर. एच. कदम यांनी सुत्रसंचलन व डॉ. एम. टी. सुर्यवंशी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. प्रा. बी. जी. बोटेवाड यांनी सर्वांचे आभार मानले. तदनंतर सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परीसरात श्रमदान करून परीसर स्वच्छता केली.

**४) एकदिवसीय कार्यशाळाः**

महाविद्यालयाने "उन्नत भारतः २.०" या कार्यक्रमात सहभाग घेतला असून त्या अंतर्गत महाविद्यालयाने पाच गावे दत्तक घेतली आहेत. त्यामध्ये उमरगा तालुक्यातील एकोंडी (ज), कदेर, बेटजवळगा, गुगळगाव व गुंजोटी या गावांचा समावेश आहे. सदरील गावामध्ये जाऊन सर्व्हे करण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची नोंदणी व एकदिवसीय कार्यशाळा दि. २०.०७.२०१८ रोजी घेण्यात आली. सदरील कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत दत्तक गावांमध्ये जाऊन प्रत्येक घराचा सर्वे कसा करावा याची माहीती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. व्ही. एस. होगाडे, डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे यांनी मार्गदर्शन केले.

**५) बँक जनधन खातेः**

दि. २१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सहकार्याने ज्या विद्यार्थ्यांची कोणत्याही बँकेत खाती नाहीत त्यांचे बँकखाते काढून देण्यात आली. या कार्यक्रमासाठी बॅकेचे शाखाव्यवस्थापक, कर्मचारी व रासेयो चे कार्यक्रमाधिका-यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमात एकुण २० विद्यार्थ्यांची खाती काढण्यात आली.

**६) ग्रामसभाः**

मौजे एकोंडी हे रासेयो नी मागील ३ वर्षापासून दत्तक घेतलेले गाव असून, ग्रामस्थांच्या सहकार्याने वर्षभार विविध उपक्रम राबवले जातात. शासनाच्या विविध योजनांची माहीती दिली जाते, समाज प्रबोधन केले जाते, वृक्षारोपन व रक्तदान शिबीरांचे आयोजन केले जाते. वर्षभराच्या कामाचे नियोजन, उन्नत भारत योजनेचा शुभारंभ करण्यासाठी दि. २५.०७.२०१८ रोजी मौजे एकोंडी येथे ग्रामसेभेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील ग्रामसभेस संस्थेचे सचिव डॉ. डी. बी. पतंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी. डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, रोटरी उमरगा चे पदाधिकारी, उन्नत भारत चे नोडल ऑफिसर डॉ. व्ही. एस. होगाडे, गावातील सरपंच, ग्रामसेवक, सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**७) ग्रामसभाः**

"उन्नत भारतः २.०" या उपक्रमातील दत्तक गाव मौजे कदेर येथे दि. ३०.०७.२०१८ रोजी ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेस महाविद्यालयाचे डॉ. जी.

एम. राठोड, डॉ. जे. ए. नन्नवरे, कार्यक्रमाधिकारी. डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, उन्नत भारत चे नोडल ऑफिसर डॉ. व्ही. एस. होगाडे, गावातील सरपंच, ग्रामसेवक, सदस्य, व ग्रामस्थ उपस्थित होते.

**८) परिसर स्वच्छता:**

दि. ०१.०८.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा अंतर्गत परीसर स्वच्छ केला.

**९) ग्रामसभा:**

दि. १५.०८.२०१९ रोजी "उन्नत भारत:२.०" अंतर्गत दत्तक गांव "मौजे बेटजवळगा" येथे ग्रामसभा घेण्यात आली व गावातील "उन्नत भारत योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकांत गायकवाड (म. बसवेश्वर महाविद्यालय, लातूर) हे होते तर डॉ. डी. बी. पतंगे (सचीव, श्रीकृष्ण शिक्षण संस्था, गुंजोटी) यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

**१०) प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी:**

प्राजासत्ताक दिनी होणा-या पथसंचलनासाठी पाठवायच्या स्वयंसेवकांची महाविद्यालयस्तरीय निवड चाचणी दि.२०.०८.२०१८ रोजी आयोजित करण्यात आली. तत्पुर्वी दि. १६.०८.२०१८ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांचे अर्ज घेण्यात आले. यामध्ये एकुण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व अर्ज केले. सर्व विद्यार्थ्यांचे दि. १६.०८.२०१८ ते १९.०८.२०१८ पर्यंत महाविद्यालयातील क्रीडा प्रशिक्षक डॉ. आर डी. पात्रे यांनी प्रशिक्षण दिले व दि. २०.०८.२०१८ रोजी अंतीम निवड चाचणी घेण्यात आली. या चाचणीत माने प्रदीप आप्पाराव या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली व त्याला दि. २१.०८.२०१८ रोजी उस्मानाबाद येथे संपन्न होणा-या जिल्हास्तरीय निवड चाचणीसाठी पाठवण्यात आले. उस्मानाबाद येथे सदरील विद्यार्थ्याचे विद्यापीठस्तरावर होणा-या निवड चाचणीसाठी निवड झाली.

**११) विद्यापीठ वर्धापन दिन:**

२३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली व १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाचा नामविस्तार होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद असे नामकरण झाले. दि. २३ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयाच्या परीसरात विद्यापीठाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून व वृक्षसंवर्धनाची गरज ओळखून श्रीकृष्ण संस्थेचे

सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांनी स्वखर्चातून महाविद्यालयाच्या रासेयो विभागाला १०० वृक्षसंरक्षक दिले व सर्व वृक्षसंरक्षक सन्माननिय पाहुण्यांच्या हस्ते परिसरात असलेल्या नवीन रोपांना लावण्यात आले.

**१२) केरळ पुरग्रस्त मदत निधीः**

जुलै - ऑगस्ट २०१८ मध्ये केरळ राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महप्रलायामुळे तेथील जनजीवन प्रभावीत झाले. संपुर्ण केरळ राज्यात खुप मोठ्या प्रमाणावर जिवीत व वित्त हानी झाली. पुरग्रस्तांना मदत करण्यासाठी संपुर्ण देशातून विवीध प्रकारची मदत करण्यात आली. महाविद्यालयातील रासेयो विभागाने याचाच एक भाग म्हणून गुंजोटी परीसरात दि. २४.०८.२०१८ रोजी "पुरग्रस्तांसाठी मदत निधी संकलन" फेरीचे आयोजन केले. या मदत फेरीचे उद्‌घाटन श्रीकृष्ण संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या मदत फेरीत एकुण १५६५७/- रुपये इतकी रक्कम संकलित झाली. सदरील रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधी, केरळ राज्य या खात्यावर ऑनलाईन जमा करण्यात आली.

**१३) रक्षाबंधनः**

दरवर्षी महाविद्यालयाचे विद्यार्थी रक्षाबंधन हा सण अनाथ मुलांबरोबर सजरा करतात. दि. २७.०८.२०१८ रोजी मौजे एकुरगा वाडी येथील "तुळजाभवानी अनाथ, अपंग मतीमंद शाळेत रक्षाबंधन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी परीसरातील झाडांना व अनाथ मुलांना राखी बांधून सामाजीक बांधीलकी जपण्याचा संदेश दिला. तसेच या कार्यक्रमात अनाथ विद्यार्थ्यांना फळवाटप सुद्धा करण्यात आले. तसेच हा दिवस श्रावण महिन्यातील सोमवारचा दिवस असल्याने उमरगा यथील महादेव मंदीर परीसरात भाविकांची खुप गर्दी असते. विद्यार्थ्यांनी मंदीराचा संपुर्ण परीसर यानिमित्ताने स्वच्छ केला.

**१४) स्वच्छ भारत सर्व्हे**

भारत सरकारच्या "स्वच्छ भारत सर्व्हे SSG 18" हे अभियान पं. स. उमरगा यांच्या सहकार्याने महाविद्यालयात राबविण्यात आले. या मध्ये स्मार्टफोन असणा-या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व आपला अभिप्राय नोंदवला.

**१५) आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसः**

दि. ०८.०९.२०१८ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी हे अध्यक्षस्थानी होते तर प्रा. आर. जी. कोळी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**१६) श्रमदान व परिसर स्वच्छताः**

नियमीत कार्यक्रमाचा एक भाग म्हणून रासेयो च्या स्वयंसेवकांनी दि.१५.०९.२०१८ रोजी तसेच दि. २२.०९.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान केले व परिसर स्वच्छता केली.

**१७) राष्ट्रीय सेवा योजना दिवसः**

दि. २४ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने दोन स्वयंसेवी संस्थांबरोबर परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला. "अंधश्रद्धा निर्मुलन समिती, महाराष्ट्र राज्य व रोटरी क्लब उमरगा यांच्या सोबत विविध समाजोपयोगी कार्यासाठी परस्परांना सहकार्य करण्यासोबतच्या करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या. महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी स्वाक्ष-या केल्या तर अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने उस्मानाबाद जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. महेश मोटे व रोटरी क्लब उमरगा यांच्या वतीने रोटरी चे अध्यक्ष मा. संतराम मुर्जानी यांनी स्वाक्ष-या केल्या. यानंतर मान्यवरांच्या हस्ते रासेयोच्या संकल्पनेतील भारताच्या प्रतिमेचे उद्घाटन करण्यात आले. मागील एक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतील 'अनाथांसाठी मदत निधी" याद्वारे प्रत्येकाच्या वाढदिवशी जमा झालेली मदत एका बंद मदत पेटीत संकलित केली जात होती. ही मदत पेटी मान्यवरांच्या उपस्थितीत व संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे याच्या हस्ते उघडण्यात आली. सदरील पेटीत एकुण १०,४१५/- रुपये इतकी रक्कम संकलीत झाली होती. सदरील रक्कम हि पुर्णतः अनाथांसाठी वापरण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. यानंतर अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या राज्य कार्याध्यक्ष मा. रुकसाना मुल्ला यांचे "वयात येतानः विज्ञान व अंधश्रद्धा" या विषयावर सखोल असे मार्गदर्शन झाले. रासेयो च्या वतीने परीसरात "रुबेलाः लसीकरण" संबंधी जागरुकता निर्माण करण्यासंबंधीचे पत्रके छापून आणली होती त्या पत्रकांचे विमोचन सुद्धा या कार्यक्रमात करण्यात आले.

**१८) सर्जीकल स्ट्राईकः**

दि. २९.०९.२०१८ रोजी महाविद्यालयात सर्जीकल स्ट्राईक दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात परीसरातील सर्व आजी माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच सैनिकांनी त्यांना आलेले लढाईतील अनुभव कथन केले. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. डी. पी. चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. एस. एस. बडोदकर यांनी केले.

**१९) गांधी जयंतीः**

दि. ०२/१०/२०१८ रोजी गांधी जयंतीनिम्मीत्त व्याख्यान आयोजीत करण्यात आले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनच्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयातील परिसरात श्रमदान करण्यात आले.

**२०) फटाके मुक्त दिवाळीः**

प्रदुषण मुक्त दिपावली हा संकल्प घेऊन महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी व अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या सहकार्याने महाविद्यालयात फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ दि. ०१.११.२०१८ रोजी घेण्यात आली. तसेच यासंदर्भात फॉर्म पण भरण्यात आले.

**२१) रक्तदान शिबीरः**

दि. ०२.११.२०१८ रोजी महाविद्यालयात श्रीकृष्ण रक्तपेढी उमरगा व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकुण ३६ रक्तदात्यांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले. हे शिबीर यशस्वी करणेसाठी श्रीकृष्ण संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदर पतंगे, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**२२) जागतिक एडस दिनः**

दि. ०१.१२.२०१८ रोजी जागतीक एडस दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत गावातून रॅली काढण्यात आली तसेच एड्स पासून संरक्षण करण्यासंबंधीचे अवाहन व त्यासंबंधी घ्यावयाची काळजी यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

**२३) रासेयो नविन कार्यालयाचे उद्घाटनः**

दि. ११.१२.२०१८ रोजी महाविद्यालयात रासेयो च्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

**२४) अनाथांना कपडे वाटपः**

मागील एक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतील 'अनाथांसाठी मदत निधी" यादवारे प्रत्येकाच्या वाढदिवशी जमा झालेली मदत एका बंद मदत पेटीत संकलीत केली जात होती. ही मदत पेटी मान्यवरांच्या उपस्थितीत व संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे याच्या हस्ते उघडण्यात आली. सदरील पेटीत एकुण १०,४१५/- रुपये इतकी रक्कम संकलीत झाली होती. सदरील रक्कमेतून तुळजाभवानी अनाथ-अपंग व मतिमंद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. सदरील कार्यक्रम दि. १२.१२.२०१८ रोजी श्रीकृष्ण संस्थेचे सचीव डॉ. दामोदर पतंगे साहेब, प्राचार्य डॉ. डी. आर कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी, विद्यार्थी शाळेचे सर्व शिक्षक यांच्या उपस्थितीत पार पडला.

**२५) विशेष शिबीरः**

दि. १२.१२.२०१८ ते १८.१२.२०१८ दरम्यान रासेयो चे विशेष शिबीर मौजे एकोंडी येथे घेण्यात आले.

**२६) युवा दिनः**

दि. १२.०१.२०१९ रोजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**२७) प्रजासत्तक दिनः**

दि. २६.०१.२०१९ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला व परीसरात श्रमदान करण्यात आले.

**२८) लोकशाही पंधरवाडाः**

मा. राज्य शासनाच्या आदेशानुसार व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या दि. २०.१२.२०१८, ०२.०१.२०१९, ०७.०१.२०१ व १६.०१.२०१९ च्या पत्रानुसार श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे राज्यशास्त्र विभाग, सांस्कृतीक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८.०१.२०१९ ते १०.०२.२०१९ दरम्यान विविध उपक्रम राबवून "लोकशाही पंधरवाडा" साजरा करण्यात आला. आपला देश जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे व आपल्या देशातील लोकशाही ही संपुर्ण जगात सर्वात जास्त भक्कम व यशस्वी असल्याचे आपल्या देशातील निवडणूक आयोगाने संपुर्ण जगाला दाखवून दिलेले आहे. आपल्या देशातील निवडणूक आयोगाची स्थापना दि. २५ जानेवारी १९५० रोजी झालेली असल्याने दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला

जातो. मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवले जातात. देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणूकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. हे या राष्ट्रीय मतदार दिवसाने अधोरेखित केलेले आहे. नवीन मतदारांमध्ये जागृतीसाठी हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने महाविद्यालयात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रम प्रचार-प्रसार फेरी, प्रात्याक्षिक इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

**दि. २१.०१.२०१९: "व्याख्यान"**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील नवमतदार विद्यार्थ्यांसाठी मतदार जागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील डॉ. अनिल देशमुख हे या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून लाभले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी हे होते तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. पी. चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दि. २२.०१.२०१९: "दिव्यांगासाठी उद्बोधन"**

दि. २२.०१.२०१९ रोजी इतिहास विभाग व रासेयो विभागाच्या वतीने महविद्यालयात "दिव्यांगासाठी उद्बोधन" शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या उद्बोधन शिबीरात प्रा. एस. एस. बडोदकर व प्रा. आर. एन. निगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बी. जी. बोटेवाड यांनी केले.

**दि. २३.०१.२०१९: "रांगोळी स्पर्धा"**

महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी "मतदार जनजागृती" या विषयावर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून मतदानाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एम. टी सुर्यवंशी यांनी विशेष प्रयत्न केले.

**दि. २४.०१.२०१९: "वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा"**

"लोकशाही व सुशासन" या विषयावर महाविद्यालयात दि. २४.०१.२०१९ रोजी वक्तृत्व स्पर्धा व तसेच निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सदरील कार्यक्रम डॉ. डी. पी. चव्हाण व डॉ. एम. जी. अंबुसे यांच्या प्रयत्नातून यशस्वी पार पाडला.

**दि. २५.०१.२०१९: "मतदार शपथ व चित्ररथ फेरी"**

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून दि. २५.०१.२०१९ रोजी सकाळी १०.१५ वाजता महाविद्यालयात उपस्थित सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदान जागरुकता "शपथ" देण्यात आली. ही शपथ कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. पी. चव्हाण यांनी दिली. ठिक १०.३० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या "मतदार जनजागृती चित्ररथाचे" उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले व प्राचार्यांनी "चित्ररथाला" हिरवा झेंडा दाखवून "प्रचार-प्रसार" फेरीस सुरवात केली. रासेयो चे स्वयंसेवक, कर्मचारी यांनी गावातून व परिसरातून मतदान जनजागृती केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. डी. आर. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन तर डॉ. आर. डी. पात्रे व श्री. सिद्राम देशमुख यांचे सहकार्य लाभले.

**दि. २६.०१.२०१९: "प्रजासत्ता दिन तसेच भित्तीपत्रक अनावरण"**

दि. २६.०१.२०१९ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या दर्शनी भागात "मतदार शपथ" या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. सदरील "शपथ" कायमस्वरुपी भिंतीवर लावण्यात आलेली आहे. या भित्तीपत्रकाचे उद्घाटन संस्थेचे सचीव डॉ. दामोदर पतंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे सर्व सदस्य, प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दि. ०१.०२.२०१९: "इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन प्रात्याक्षिक"**

निवडणूक आयोग व तहसील कार्यालय उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात **"इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन प्रात्याक्षिक"** चे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व नवीन पद्धतीची माहीती घेण्यात आली. मुख्य प्रशिक्षक श्री. बी. ए. कडगंचे यांनी सर्वांना प्रशिक्षण दिले.

## २९) शिवजयंती

दि. १९.०२.२०१९ रोजी महाविद्यालयात सेवा योजना विभागामार्फत शिवजयंती साजरी करण्यात आली व परिसरात श्रमदान करण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी
PROGRAMME OFFICER
NATIONAL SERVICE SCHEME
SHRIKRISHNA MAHAVIDYALAYA GUNJOTI

प्राचार्य
PRINCIPAL
Shrikrishna Mahavidyalaya
Gunjoti Tq. Omerga

# SHRIKRISHNA MAHAVIDYALAYA, GUNJOTI

Tq. Omerga, Dist. Osmanabad

# NATIONAL SERVICE SCHEME

## Special Camp Report (12.12.2018 to 18.12.2018)

Shrikrishna mahavdiyalya, Gunjoti affiliated to Dr. Babasheb Ambedkar Marathwada University, Aurangabad, organized a Special NSS Camp of 7 days in adopted village Ekondi from 12/12/2018 to 18/12/2018. The theme of the NSS camp held this year was " Water Conservation and Water Management" as per the guidelines of Director of NSS Dr. B. A.M. U. Aurangabad. The preparation of camp started a week ago before the date of camp. A Meeting was organised to discuss the planning of the camp under the guidance of Principal Dr. D.R. Kulkarni and Advisory Committee of NSS. In this seven day camp we have taken up some of the works which are listed out in pre camp survey by interacting with Sarpanch, ward members and Villagers. In this special camp various activities like survey of adopted village, medical check-up, AIDS awareness, Cleanliness camp, personality development, various talks and activities were conducted.

- ✓ The activities done in the Camp
- ✓ Swachh Bharat Abhiyan
- ✓ Beti bachao beti padhao
- ✓ Water Conservation and Water Management awareness program
- ✓ Health Camp for women
- ✓ Blood Donation Camp
- ✓ Tree Plantation
- ✓ Voters awareness camp

- ✓ Conducted guest lecturers for NSS Volunteers
- ✓ Unaat bharat Abhiyan
- ✓ Andhshradha Nirmulan

**Day I: Inauguration of Camp:**

The students reached the village by 10.00 a.m. and cleaned the place of the stay. Then students were given the opportunity to have an interaction with the villagers and familiarize themselves with village. Then volunteers took out a rally through village to introduce villagers to ensuing NSS camp. Just after rally, a meeting was called in with village peoples and panchayat representatives. People showed good response in return, they stood with us to help in all the odds. They provided us place for stay, water for use and drinking.

We organised Inauguration Ceremony of the camp at 4.00 p.m. in the front of Panchayat office. The camp was inaugurated by Chief-guest Suryakant Aglave Dist. Co-ordinator of NSS in the presence of Dr. D.B. Patange Saheb Secretary of Shrikrishna Education society Gunjoti, Guest of Honour Santaramji Murjani, Dr. Dhanraj Menkudle , Mr. Chandrashekhar Suryawanshi, Mr. Vikram Ingle, Mr. Prabhakar Tate and panchayat representatives. The function began with Lamp lighting and offering a garland to the photo of Saint. Gadgebaba.

Prof. Suryakant Aglave delivered the inaugural address. He discussed the aims of NSS and Social awareness. He also elaborate the importance of village development by singing a poem. Dr. D.B. Patange Saheb Secretary of Shrikrishna Education society Gunjoti, was the Chairman for inauguration function in his presidential address, he appreciated the student for joining the NSS Scheme and encouraged them to involve themselves in the similar social service practices. He

also encouraged students for blood donation and concluded his speech with message for water conservation and water management.

Principal Dr. D. R. Kulkarni gave introduction of NSS activities of college unit and objectives behind organising the special camp. Mr. Santaramji Murjani – President of Rotary Club Omerga shared facts and new techniques of water management. Dr. Dhanraj Menkudle – Secretary of Rotary Club Omerga also addressed and intracted with the students. He also discussed with students some of the tricks that can help to save natural resources such as rainwater harvesting, switching off electrical gadgets when not required. Finally Dr. D.P. Chavan - P.O. extended vote of thanks. The Inauguration ceremony anchored by Prof. B. G. Botewad

**Day II:**

The day started with morning assembly and Yoga exercises. After Breakfast 'Shramdan' was organised in the village to spread message about hygiene, cleanliness and impact on environment and to make people aware of 'Swacha Bharat Abhiyan'. In the evening at 3.00 p.m. a lecture of Dr. Mahesh Mote was organised on Andhashradha Nirmulan Dr. R. D. Patre was the president for this Lecture. The session was very interactive and lively in which volunteers asked numerous questions. Dr. Mahesh Mote sir said that scientific temperament is essential to eradicate superstitions from the society. Dr. R.D. Patre added that NSS students can make great contribution to take the movement forward.

**Day III:**

The day began with 'Shramdan' volunteers cleaned the roads, and levelled all the lanes of village. After the lunch break volunteers assembled for the lecture. The

NSS volunteers were made aware of Diaster Management by Dr. R. H. Kadam – P.O. of NSS. The volunteers were sensitized on pre and post disaster management techniques. In the evening an Awareness programme on environment was conducted. A group discussion programme on impact of Green House effect and Global warming was organised and volunteer shared their views with enthusiasm. Dr. D. P. Chavan – P.O. addressed the volunteers.

**Day IV:**

The day started with shramdan. Volunteers removed dust heaps form the premises of anganwadi and cleared the stagnate drainage while some volunteers particularly girls divided themselves into subgroups and went for village survey. Volunteers have collected the detailed information of number of families. They collected information like age group, males and females, status of hygiene, source for drinking water, cleanliness and education status of family. Volunteers learned how to interact with the peoples and analyze the problems in society.

In the evening at 3.00 p.m. a lecture was organised. The subject for the day was Organic farming and fish farming. Dr. G.M. Rathod Head of Botany Department Shrikrishna Mahavidyalya Gunjoti discussed modern approach to framing he said that organic farming works in harmony with nature rather than against it. Dr. D.M. Pathan Head of Zoology Department Shrikrishna Mahavidyalya Gunjoti discussed the importance of Fish Farming to mankind he said that fish are excellent source of vitamins and less expensive so fish farming is better alternative to reduce stress on food and provide employment for small scale industries.

**Day V:**

Day started with Shramdan and remaining survey of village. At 3.00 p.m. a talk on 'water management and farming' was organised. Dr. M. T. Suryawanshi Head of Geography Department was president for this talk and Prof. R. G. Koli of Geography department the speaker of the day discussed various water conservation strategy and sustainable use of water for farming. Dr. M. T. Suryawanshi discussed various technologies for ground water recharge.

**Day VI:**

On the sixth day Blood Donation camp was organised by NSS unit in collaboration with shrikrishna Blood Bank, Omerga. The NSS volunteers actively participated in blood donation camp and 27 blood donor donated blood durin camp.

In the evening women health camp was organised. Dr. Ambika Patange – Gynaecologist accepted the request of our NSS unit and visited camp with her assistants. A public announcement was made and door to door communication was made by our volunteers to inform women to avail for health checkups. The response was excellent.

**Day VII: Valedictory:**

The VII day was the closing day of camp. The day began with shramdan. Volunteers cleaned the school premises and watered the plants. Sarpanch village peoples and school boys joined hands for some times.

The second session of day was allotted to valedictory function. The function was presided over by Dr. D.R. Kulkarni- Principal of College. Shri Pravin Swami –

Former President of Roatry Club of Omerga was the chief Guest. Shri B. A. Mujawar Head-Master of Z.P. School Of Ekondi, Shri Chandrshekhar Suryawanshi, Vikram Ingle, panchayat representatives, and faculty members attended the function.

P. O. Dr. R.H. Kadam addressed the gathering and explained about various activities undertaken during their 7 days period of stay in village. NSS Volunteers Mr. rushikesh Patil, Shantappa Pujari, Miss Santoshi Gaikwad, Mr Landge, ..... shared their feelings of togetherness that they have experienced throught the camp. They were happy that they were the part of this camp. They said that the experiences, knowledge gained in this camp would change their outlook on life. Shri Chandrashekhar Suryawanshi leader of village thanked the volunteers and program officer and the Management of the college for their various activities and assured all sorts of co-operation in future as an adopted village.

In his address to the volunteers Pravin Swami Sir motivated the students for voluntary contribution towards the society. Earlier Principal Dr. D.R. Kulkarni welcomed the chief-guest and congratulated the NSS volunteers on the successful conduct of the 7day camp. The session concluded by vote of thanks proposed by Dr. R.H. Kadam and valedictory function anchored by Volunteer Ajay Shinde

Programme Officer
PROGRAMME OFFICER
NATIONAL SERVICE SCHEME
SHRIKRISHNA MAHAVIDYALAYA GUNJO...

Principal
PRINCIPAL
Shrikrishna Mahavidyala...
Gunjoti Ta. Omer...

# Photos and News of NSS activity 2018-19



Tree Plantation



Tree Plantation



लोकमत

## पूरग्रस्तांसाठी परंडा, गुंजोटीत मदत फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

परंडा / गुंजोटी : केरळ राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले आहे. केरळातील पूरग्रस्तांसाठी परंडा शहरासह उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे मदत फेरी काढण्यात आली.

केरळ येथे झालेल्या पूर परिस्थिती मुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या आपत्तीत प्रचंड अर्थिक नुकसान होऊन राज्यातील १४ पैकी ११ जिल्हे पाण्याखाली गेले आहेत. पूरग्रस्तांना मदत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यातील शहरी, ग्रामीण भागातून मदत फेरी काढण्यात येत आहेत. केरळ येथील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी परंडा येथील व्यापारी महासंघाने पुढाकार घेतला. व्यापारी महासंघाने पुढाकार घेऊन शुक्रवारी मदत फेरी काढली. शहरातील आठवडा बाजार व्यापारी संकूल, टिपू सुलतान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, करमाळा रोड, बाजार समिती व बसस्थानक परिसरापर्यंत फेरी काढण्यात आली. शहरातील लहान-मोठ्या व्यापाऱ्यांसह नागरिकांनी सढळ हाताने मदत केली. मदतफेरीतून संकलित निधी केरळ राज्याकडे पाठविण्यात येणार आहे.

यावेळी व्यापारी संघाचे तालुका अध्यक्ष वाजीद दखनी, हनुमंत विटकर, तनवीर डोंगरे, गफ्फार शेख, अभय देसाई, सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष मनोज चिंतामणी, दीपक महामुनी, इरशाद डोंगरे, माजी नगरसेवक राहुल बनसोडे, मतीन डोंगरे, जैनूद्दीन करपुडे, जावेद करपुडे आदींची उपस्थिती होती.

उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी संस्थासचिव डॉ. दामोदर पतंगे यांच्या उपस्थितीत मदत फेरी काढली. महाविद्यालयापासून या मदत फेरीस प्रारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांनी काढलेल्या या मदत फेरीत गावातील व्यापारी, विद्यार्थी, मजूर, शेतकरी, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यासह सरपंच शंकरराव पाटील, उपसरपंच शिवाजीराव गावकवाड, चेअरमन बलभीम शाईवाले, दत्तू कटकधोंड, ग्रामविकास अधिकारी जी.बी. हलबुर्गे, बँक अधिकारी, ग्रामस्थांनी सढळ हाताने मदत केली.

या मदत फेरीत महाविद्यालयाचे प्राचार्य डी.आर. कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समनवयक डॉ. राम कदम, डॉ.आर.डी. पात्रे, डॉ.डी.पी. चव्हाण, डॉ. एम.जी. अंबुसे, डॉ. बी.जे. उगले, प्रा कल्याण कदम, डॉ. बालाजी बोटेवाड, शशिकांत कदेरे, दुर्योधन जमादार, नरसिंग जाधव, उध्दव जमादार, मंगलबाई देसाई यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. केरळ येथील पूरग्रस्तांसाठी या फेरीतून मदत संकलित करण्यात आली आहे. संकलित झालेला मदत निधी केरळ राज्यासाठी दिला जाणार आहे.

Hello Osmanabad
Page No. 2 Aug 25, 2018
Powered by: erelego.com

Kearal Flood Reilif Fund



CHIEF MINISTER'S DISTRESS RELIEF FUND
KERALA

**B No : 629715354349045**

Received with thanks the sum of ₹. 15657/- (Rupees Fifteen Thousands Six Hundred And Fifty Seven only) from national service sheme shrikrishna mahavidyalaya Gunjoti as donation towards **'Chief Minister's Distress Relief Fund'**.

Contribution to CMDRF is **100% tax** exempt under Section 80G(2) of the Income Tax Act,1961 vide **PAN No. AAAGD0584M**.

Manoj Joshi

**Thiruvananthapuram**
**28-08-2018**

**Principal Secretary(Finance)**
**Treasurer**
**Chief Minister's Distress Relief Fund**



उस्मानाबाद जिल्हा

झटपट बातम्या

## गुंजोटीच्या शुभांगी चौधरीची राज्यस्तरीय पथसंचलनासाठी निवड

गुंजोटी | उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या शुभांगी चौधरी या विद्यार्थीनीची प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पथसंचलनासाठी महाविद्यल्यीन गटातून निवड झाली आहे. महाविद्यल्यीन विभागातुन पथसंचलनासाठी मान जिल्ह्यातून शुभांगीच्या रुपाने गुंजोटीच्या श्रीकृष्ण महाविद्यालयाला मिळाला आहे. या निवडीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने शुंभागी चौधरीचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. दामोदर पतंगे, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकृष्ण कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. आर. डी. पात्रे यांची उपस्थिती होती. जिल्ह्यातून एकमेव व विद्यापीठातून निवड झालेल्या चौघांमध्ये शुंभागीचा समावेश आहे. सराव शिबिरासाठी दि. १७ ते २६ जानेवारी या १० दिवसाच्या तालीमसाठी शुंभागी सहभागी होणार आहे.

Selection of NSS Volunteer for Pared at Mumbai on 26th January.

# Photos and News of NSS activity 2018-19

लोकमत

स्वामी : एकोंडी येथील रासेयो शिबीराचा समारोप

## विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी कार्य मनापासून करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना सेवेची जाण व्हावी, सेवेतून कार्य घडावे यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे आयोजन केले जाते. आपण समाजोपयोगी कुठलेही कार्य करत असताना ते मनापासून केल पाहिजे, असे प्रतिपादन उमरगा रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष प्रवीण स्वामी यांनी व्यक्त केले.

उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने एकोंडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा बुधवारी समारोप करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास सरपंच लक्ष्मीबाई ताटे, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी, माजी सरपंच विक्रम इंगळे, शालेय समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर सूर्यवंशी, मुख्याध्यापक बी. ए. मुजावर, ग्रा. पं. सदस्या संगीता पांचाळ, सलमा सय्यद, बाळासाहेब येवते, प्रभाकर ताटे, डॉ. रमेश पात्रे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. राम कदम, कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डी. आर. कुलकर्णी यांनी उन्नत भारत अभियान, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून संस्कार व्हावे यासाठी महाविद्यालय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले. अजय शिंदे यांनी सूत्रसंचालन तर राम कदम यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रशांत गुरव, दिगंबर चव्हाण, एम. जी. अंबुसे, शुभांगी गायकवाड, नरसिंग जाधव, मोती जेठीथोर, प्रा. बी. जे. बोटेवाड आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.



श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने एकोंडी येथे आयोजित रासेयो शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रवीण स्वामी.

### सात दिवस विविध कार्यक्रम

◆ सात दिवसीय शिबिरात गावातील स्वच्छता, भर भरणे, रक्तदान शिबीर, स्वच्छता जनजागृती, रुबेला लसीकरण मदत, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, शौचालय वापर करणे, जनजागृती आदी उपक्रम राबविण्यात आले.

Hello Osmanabad
Page No. 4 Dec 21, 2018
Powered by: erelego.com

NSS Camp News

## राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन : डॉ. पतंगे

उमरगा, दि. १७ (प्रतिनिधी) :

पाण्याचे योग्य नियोजन अभावी दुष्काळाला तोंड द्यावे लागते. प्रत्येकानी आपली जबाबदारी ओळखुन पाण्याचे योग्य नियोजन केल्यास जल संवर्धन व जल व्यवस्थापन नक्कीच होईल. आपल्या महाविद्यालयाने एकोंडी (ता. उमरगा) हे गांव दत्तक घेऊन त्याचा विकास साधन्याकरिता गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरूपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत.त्यातून त्यांचे संघटन कौशल्य निर्माण होईल.

राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे शसक्त साधन मानले गेले आहे. असे मार्गदर्शन श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ दामोदर पतंगे यांनी केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व रोटरी क्लब उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक गांव एकोंडी (ज) येथे (दि.१२) बुधवार रोजी मजल संवर्धन व जल व्यवस्थापनक या विशेष शिबिराच्या निमित्ताने बोलत होते.

दि.१२ डिसेंबर ते १८ डिसेंबर च्या या सात दिवसीय शिबिरासाठी उद्घाटक म्हणुन जिल्हा समन्वयक प्रा सूर्यकांत आगलावे,तर प्रमुख उपस्थितीत सरपंच सौ लक्ष्मीबाई ताटे, उमरगा रोटरी क्लबचे अध्यक्ष संतराम मुरजानी, सचिव डॉ धनंजय मेनकुदळे, प्राचार्य डी आर कुलकर्णी,माजी सरपंच विक्रम इंगळे, शालेय समिति अध्यक्ष चन्द्रशेखर सुर्यवंशी,बाळासाहेब येवते, प्रभाकर ताटे, कार्यक्रम अधिकारी डॉ राम कदम,डॉ डी पी चव्हाण,डॉ एम जी अंबुसे मान्यवर उपस्थित होते. या सात दिवसीय शिबिराच्या माध्यमातुन एकोंडी गावातील शोषखड्डे, स्वच्छता मोहिम,जलसंधारनाची कामे,अंतर्गत रस्ते निर्मिती, रक्तदान शिबिर,आरोग्य तपासणी,सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रम,मतदार नाव नोंदणी जण जागृती,शौचालय बांधकाम व नियमीत वापरन्यासाठि प्रवृत्त करणे,बेटी बचाव बेटी पढाव जणजागृती,नदिवरिल बांध घालने आदि कामे या शिबीरा दरम्यान करण्यात येणार आहेत. या निमित्ताने जिल्हा समनवयक सूर्यकांत आगलावे, रोटरी क्लबचे संतराम मुरजानी,धनंजय मेनकुदळे, शेखर सूर्यवंशी यांनी शुभेच्छा पर आपले विचार तर प्राचार्य डी आर कुलकर्णी यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमासाठी डॉ के एस लोहार, डॉ रमेश पात्रे,डॉ एम सी खोत, प्रा योगिराज बिजापुरे,प्रा संजय बडोदकर, विनोद पतंगे, प्रा बालाजी बोटेवाड, सह प्राध्यापक, प्रशासकिय कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते. प्रा बालाजी बोटेवाड यांनी सूत्रसंचलन तर आभार डॉ डी पी चव्हाण यांनी मानले.



NSS Camp News

# Photos and News of NSS activity 2018-19

## अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्याकरिता समाजातील युवकांनी वैज्ञानिक

**उमरगा :** आपल्या देशाला अधिक विज्ञाननिष्ठ बनविण्यासाठी समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा रोखून दिवसेंदिवस समाजात वाढत असणाऱ्या अंधश्रध्देचे निर्मूलन करण्याकरिता समाजातील युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा, असे महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. महेश मोटे यांनी प्रतिपादन केले.

एकोंडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व जल व्यवस्थापन हे विशेष शिबीर शनिवार दि. १५ रोजी अंधश्रध्दा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रमेश पात्रे होते. यावेळी डॉ. दिलीप कुलकर्णी, उपसरपंच मारुती राठोड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. मोटे म्हणाले क, कुठलेही ज्ञान मिळविण्यासाठी जिज्ञासा, काहीतरी शोधण्याची वृत्ती व विज्ञानाची पद्धत आत्मसात करून वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा व बेध्दीक विकास साधला पाहिजे. अशी दृष्टी निर्माण झाल्यास जगातील कुठलेही शक्त तुम्हाला फसवू शकत नाही. समाजात ज्या घातक प्रवृती वाढत आहेत. त्या नष्ट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न झाले पाहिजेत. त्यामुळेच लोकसहभाग महत्वाचा असून तो वाढविणे महत्वाचे आहे. डॉ. कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ बणुन समाजातील अंनिष्ठ प्रथा नष्ट करण्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे. अध्यक्षीय समारोपात डॉ. पात्रे यांनी अशा सार्वजनिक उपक्रमात व समाजकार्यात तरूणांनी एकसंघ राहून राष्ट्रहित जोपासले पाहिजे व समाजाला लागलेली अंधश्रद्धेची कड नष्ट केली पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. राम कदम यांनी करुन दिला. सूत्रसंचालन स्वंयसेवक सुरेश लांडगे तर आभार शुंभागी गायकवाड यांनी मानले.

**NSS Camp News**

लोकमत

## विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**गुंजोटी :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील रासेयो विभागातील विद्यार्थ्यांनी स्वखर्चातून एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अनाथ मतिमंद, अपंग शाळेतील ६० विद्यार्थ्यांना कपड्यांचे व खाऊचे वाटप केले.

विद्यार्थ्यांनी अवांतर खर्च करण्यापेक्षा गरजू विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप केले आहे. हे काम केवळ राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी करु शकतात, असे प्रतिपादन अस्मिता विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. दामोदर पतंगे यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करीत विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमास प्राचार्य डी.आर. कुलकर्णी, समन्वयक डॉ. राम कदम, डॉ. डी.पी. चव्हाण, डॉ. एम. जे. अंबुसे, डॉ. आर. डी. पात्रे, शाळेचे मुख्याध्यापक बी. एस. शिंदे, प्रा बालाजी बोटेवाड, प्रा. प्रतीक्षा गुंजकर, प्रा ए. ए. सिद्दीकी, सिद्राम देशमुख यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 4 Dec 15, 2018
Powered by: erelego.com

लोकमत




एकुरगावाडी येथील विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप करताना डॉ. दामोदर पतंगे व मान्यवर.

Hello Osmanabad
Page No. 4 Dec 15, 2018
Powered by: erelego.com

**NSS Camp News**

# Photos and News of NSS activity 2018-19

लोकमत

## जलसंवर्धनासाठी नियोजनाची गरज

### दामोदर पतंगे : एकोंडी येथे रासोयोचे शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : पाण्याचे योग्य नियोजन नसल्याने दुष्काळाला तोंड द्यावे लागत असल्याने सांगून प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून पाण्याचे योग्य नियोजन केल्यास जल संवर्धन व जल व्यवस्थापन नक्कीच होईल, असे प्रतिपादन श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ दामोदर पतंगे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उमरगा रोटरी क्लब यांच्या वतीने दत्तक गाव एकोंडी (ज) येथे 'जल संवर्धन व जल व्यवस्थापन' या विशेष शिबिराच्या निमित्ताने ते बोलत होते.उद्घाटक म्हणून जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे, तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच लक्ष्मीबाई ताटे, रोटरी क्लबचे अध्यक्ष संतराम मुरजानी, सचिव डॉ. धनंजय मेनकुदळे, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी, माजी सरपंच विक्रम इंगळे, शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर सूर्यवंशी, बाळासाहेब येवते, प्रभाकर ताटे, कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी डॉ. के. एस. लोहार, डॉ. रमेश पात्रे, डॉ. एम. सी. खोत, प्रा. योगिराज विजापुरे, प्रा. संजय बड़ोदकर, विनोद पतंगे, प्रा. बालाजी बोटेवाड आदी उपस्थित होते. प्रा. बालाजी बोटेवाड यांनी सूत्रसंचलन केले तर डॉ. डी. पी. चव्हाण यांनी आभार मानले.



एकोंडी येथे विशेष शिबिरात श्रमदान करताना विद्यार्थी.

◆ सात दिवसीय शिबिराच्या माध्यमातून उमरगा तालुक्यातील एकोंडी गावातील शोषखड्डे, स्वच्छता मोहीम, जलसंधारनाची कामे, अंतर्गत रस्ते निर्मिती, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रम, मतदार नाव नोंदणी जनजागृती, शौचालय बांधकाम व नियमित वापराबाबत जनजागृती आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

Hello Osmanabad
Page No. 3 Dec 17, 2018
Powered by: erelego.com

**NSS Camp News**

सकाळ

## श्रीकृष्ण महाविद्यालयाचे एकोंडी येथे शिबिर

**गुंजोटी, ता. १३ (बातमीदार)** : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराला एकोंडी (ज., ता. उमरगा) येथे बुधवारी (ता.१२) प्रारंभ करण्यात आला. हे शिबिर १८ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

रासेयोचे जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ समाजसेवक व श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे अध्यक्षस्थानी होते. या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष संतराम मुरजानी, सचिव डॉ. धनंजय मेनकुदळे, डॉ. राम कदम, प्रा. डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, सरपंच लक्ष्मी ताटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर सूर्यवंशी, विक्रम इंगळे-पाटील यांची उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. शिबिरात ५० पेक्षा अधिक स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. सकाळी योग, प्राणायाम व कवायती, शोषखड्डे ग्रामस्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, जलसंधारणाची कामे, रक्तदान, महिलांची हिमोग्लोबीन तपासणी, अंतर्गत रस्ते निर्मिती, सेंद्रिय शेती, मौखिक आरोग्य, अंधश्रद्धा निर्मूलन, सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रम आदी उपक्रम घेण्यात येणार आहेत. प्रा. बालाजी बोटेवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राम कदम यांनी आभार मानले. प्रा. डॉ. दिगंबर चव्हाण यांनी आभार मानले.

Aurangabad, Osmanabad-Today
14/12/2018 Page No. 3

लोकमत

## युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा

लोकमत न्यूज नेटवर्क

उमरगा : देशाला अधिक विज्ञाननिष्ठ बनविण्यासाठी समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा रोखून दिवसेंदिवस समाजात वाढत असणाऱ्या अंधश्रध्देचे निर्मूलन करण्यासाठी युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा, असे आवाहन महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले.

उमरगा तालुक्यातील एकोंडी येथे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शिबिरात 'अंधश्रध्दा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टीकोन' या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रमेश पात्रे होते. यावेळी प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी, उपसरपंच मारुती राठोड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, प्रा.गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मोटे म्हणाले की, कुठलेही ज्ञान मिळविण्यासाठी जिज्ञासा, काहीतरी शोधण्याची वृत्ती व विज्ञानाची पद्धत आत्मसात करून वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासावा व बौध्दीक विकास साधावा. समाजात वाढत चाललेल्या घातक प्रवृती नष्ट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी लोकसहभाग महत्वाचा असल्याचेही ते म्हणाले. प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ बनून समाजातील अंनिष्ठ प्रथा नष्ट करण्याकरिता पुढाकार घेण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. राम कदम, सूत्रसंचालन सुरेश लांडगे यांनी केले. शुंभागी गायकवाड यांनी आभार मानले.



Hello Osmanabad
Page No. 3 Dec 18, 2018
Powered by: erelego.com

**NSS Camp News**